**साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
०२०-२५५३८०४१ ते ४४, Ext.no.३१७ commsugarvikas@gmail.com
साखर आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे

जा.क्र.साआ/विकास/वजनकाटे/५६८/२०२५ दिनांक- १०ऑक्टोबर, २०२५

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

विषय-साखर कारखान्यांचे वजनकाटे तपासणी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत..

कृपया वरील विषय पाहावा.

२/- वरील विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील गाळप हंगाम २०२५-२६ सुरु झालेला असून साखर कारखान्यांचे वजनकाटे तपासणीबाबत शेतकरी संघटनांकडून सतत मागणी होत आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन भरारी पथकांची स्थापना करुन सदर भरारी पथकामार्फत ऊस वजनकाटयाची तपासणी करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३/- गाळप हंगाम २०२५-२६ मध्येदेखील मागील वर्षाप्रमाणे प्रत्येक जिल्हायामध्ये कार्यरत साखर कारखान्यांच्या प्रमाणात तालुकानिहाय अथवा जिल्हा स्तरावर भरारी पथकाची स्थापना करावी. सदर भरारी पथकामध्ये महसूल, पोलीस, वैद्यमापन शास्त्र विभाग,प्रादेशिक सहसंचालक (साखर) व शेतकरी यांचे प्रतिनीधींची नियुक्ती करावी. कार्यरत साखर कारखान्यांच्या प्रमाणात तालुकानिहाय गरजेनूसार भरारी पथक स्थापन केल्यास तालुकास्तरीय संबंधित विभागाचे अधिकारी भरारी पथकातील सदस्य राहातील आणि जिल्हा स्तरावर भरारी पथक स्थापन केल्यास जिल्हास्तरीय अधिकारी भरारी पथकातील सदस्य राहतील.

**भरारी पथकाची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे राहील.**

१.भरारी पथकातील सदस्यांची नावे व संपर्क क्रमांक कार्यक्षेत्रातील साखर कारखाने व शेतकरी यांना उपलब्ध होतील अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात यावीत.

२.जिल्हायातील भरारी पथकांनी स्वयंस्फुर्तीने कारखाना स्थळावर अचानक भेटी देऊन वजनकाटयांची तपासणी करावी. जेणेकरुन ऊसाचे वजना संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर आळा बसेल.

३.शेतकऱ्यांना वजनाची पावती योग्य प्रकारे देण्यात येते किंवा कसे याची खात्री करणे.

४.एखाद्या साखर कारखान्याच्याबाबतीत ऊसाचे वजनाबाबत गैरप्रकार होत असल्याची तक्रार यंत्रणेस किंवा पोलीसांकडे प्राप्त झाल्यावर लगेच त्या साखर कारखान्याचे वजनकाटयाची तपासणी करावी आणि गैरप्रकार आढळल्यास यंत्रणेमार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

५.वजनकाटयाच्या तपासणीमध्ये काही गैर कायदेशीर बाबी आढळल्यास सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी.

६. ऊस वजन काटा कॅलिब्रेशन मध्ये फेरफार करुन ऊस वजन काटामारी केली जाते अशा तक्रारी प्राप्त होत आहे. यासाठी ऊस वजनकाटा कॅलिब्रेशन करून सील करणे आवश्यक आहे. संबधित वैधमापन अधिकाऱ्याने वजनकाटयाची तपासणी करतेवेळी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन ऊस वजन काटे कॅलिब्रेशन झालेनंतर सील करावेत.

वरीप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Digitally signed by
SANJAY GENDRAJ KOLTE
Date: 10-10-2025
14:16:53
(डॉ.संजय कोलते)
आयुक्त (साखर)

प्रति,

१.मा. नियंत्रक, वैद्यमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य शासकीय कुटीर क्रमांक ७, फ्रि प्रेस जनरल मार्ग,मुंबई-२१

२.जिल्हा पोलिस अधिक्षक,(सर्व)

३. प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)